# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती

Email :- roamravati.dte@gmail.com
Phone :- 0721-2573027, 2572577

Web :- www.jdroamt.org
Fax :- 0721- 257 7913


**कालमर्यादा :- दि. १५.२.२०१२**

क्रमांक :- विकाअ/आस्था/ आ.प्र.योजना/२०१२/ २९३
दिनांक :-

**प्रति,**

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती
शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती/खामगांव/वाशिम/यवतमाळ/मुर्तिजापुर
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ.

**विषय :- दि. ३१.८.२०११ पर्यंत सुधारीत आश्वासित प्रगती योजनेच्या दुस-या लाभास पात्र (२४ वर्ष) असणा-या वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचा-यांची माहिती सादर करण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, आपले संस्थेतील जे वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी दि. ३१.८.२०११ पर्यंत सुधारीत आश्वासित प्रगती योजनेच्या दुस-या लाभास पात्र आहेत. अशा कर्मचा-यांना आश्वासित प्रगती योजना वरिष्ठ वेतनश्रेणी मंजुर करण्याकरिता सोबत जोडलेल्या प्रपत्रातील **परिपुर्ण माहिती MS Excel 2003 मध्ये DVB-TTSurekh या फॉन्टमध्ये तयार करुन** ई-मेलद्वारे **स्कॅन न करता** या कार्यालयास **दि. १५.२.२०१२ पर्यंत** सादर करावी.

पात्र कर्मचा-यांची माहिती सादर करतांना ती संबंधीत कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तकातील नोंदीवरुन तपासुन अचुक माहिती सादर करण्यात यावी. तसेच दि. ३१.८.२०११ पर्यंत सुधारीत आश्वासित प्रगती योजनेस पात्र असणा-या सर्व कर्मचा-यांच्या नावाचा समावेश प्रस्तावात करण्यात यावा.

ज्या कर्मचा-यांची प्रकरणे यापुर्वी सादर करण्यात आलेली होती, तथापी **काही कारणास्तव अद्यापपर्यंत मंजुर झालेली नाहीत त्यांची माहिती सुध्दा प्रपत्रात देण्यात यावी. तसेच प्रकरण मंजुर न होण्याची कारणे सुध्दा नमुद करावीत.** वर्ग-४ चे ज्या कर्मचा-यांची नावे प्रस्तावात समाविष्ट आहेत अशा सर्व कर्मचा-यांचे (स्वयंमुल्य निर्धारण) गोपनिय अहवालाची संपुर्ण नस्ती गोपनिय पत्राव्दारे या कार्यालयातील गोपनिय विभागास स्वतंत्र सादर करण्यात यावी.

सदर प्रस्तावामध्ये कोणत्याही कर्मचा-यांचे नांव सुटणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**सहपत्र :-** प्रपत्र.

(प्र.वि. सरोदे)
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- १. लघुलेखक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
२. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का., अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

# विवरणपत्र - अ

## गट-क आणि गट-ड (वर्ग-३ व ४) मधील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने शासकीय कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासंबंधीच्या योजनेअंतर्गत १२ व २४ वर्षे सलग सेवा पुर्ण केलेल्या कर्मचा-यांचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र | कर्मचा-याचे नांव | शासन सेवेत प्रथम नियुक्तीचे पदनाम व नियुक्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचे पदनाम व सदरील पदावर रुजु होण्याचा दिनांक | सध्याची वेतन श्रेणी | नियुक्तीचे दिनांकापासुन १२ वर्ष सलग सेवा पुर्ण होण्याचा दिनांक | कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली पहिला लाभ मंजुर झाल्याचा दिनांक | पहिली कालबध्द पदोन्नती मिळाल्याचे दिनांकापासुन पुढे १२ वर्ष सलग सेवा पुर्ण होण्याचा दिनांक | सध्याच्या वेतनश्रेणी पदोन्नती साखळीतील वरिष्ठ वेतन श्रेणी | विभागीय चौकशी प्रलंबित आहे काय? | विभागीय परीक्षा उत्तीर्ण किंवा सूट मिळाली आहे का? | यापुर्वी किती पदोन्नती देण्यात आल्यात | यापुर्वी नियमित पदोन्नती नाकारली आहे काय | जातीचा प्रवर्ग जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त/ अप्राप्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional